# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व.इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.),
ता.जि. ठाणे, 401 101.

25 वर्षे विकासाची
"माझे शहर, माझा अभिमान"

**जा.क्र.मनपा/आस्था/1371 /2026-27** **दि. 15/10/2026**

विषय :- सामान्य नागरिकांच्या तक्रारींचा सहाय्यक आयुक्त (AMC) विभाग प्रमुख (HOD) यांच्या उत्तरांनंतर प्रकरणांचे पुनर्विलोकन करणेबाबत...

संदर्भ :- जा.क्र.मनपा/आयुक्त/30/2026-27, दि.01/07/2026 रोजीचे परिपत्रक

परिपत्रक

मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये सामान्य नागरिकांकडून दैनंदिन कामासाठी सादर तक्रारी, निवेदने आणि स्मरणपत्राच्या अनुषंगाने असे निदर्शनास आले आहे की, संबंधित सहाय्यक आयुक्त अथवा विभागप्रमुख यांच्याकडून बऱ्याच प्रकरणांमध्ये अपूर्ण, अस्पष्ट किंवा मूळ मुद्याला बगल देणारी, दिशाभूल करणारी उत्तरे दिली जातात. नागरिकांनी त्यावर वरिष्ठ स्तरावर पुनर्विलोकनासाठी स्मरणपत्रे सादर केल्यानंतरही, संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांकडून प्रकरणांचा गांभीर्याने आढावा घेतला जात नाही. तसेच त्यावर कोणतेही कारणायुक्त समर्पक लेखी उत्तर दिले जात नाही. नागरिकांच्या तक्रारींचे वेळेत निराकरण न होणे, प्रकरणांचे योग्य पुनर्विलोकन न करणे तसेच तक्रारदारांना कारणयुक्त लेखी उत्तर न देणे यामुळे प्रशासकीय कामकाजाबाबत असंतोष निर्माण होण्याची शक्यता आहे आणि याबाबत नागरीकांकडून वारंवार या कार्यालयाकडे तक्रारी प्राप्त होत आहेत. केवळ अंतर्गत प्रशासकीय पत्रव्यवहारापुरते मर्यादित न राहता, अधिनस्त अधिकारी/कर्मचारी यांच्या कामकाजावर प्रभावी नियंत्रण ठेवणे आणि प्रशासकीय उत्तरदायित्वाची साखळी बळकट करणे ही अधिकारी/कर्मचारी यांची मुख्य जबाबदारी आहे.

मा.आयुक्त यांनी संदर्भिय परिपत्रकामध्ये मार्गदर्शक सूचना व आदेश पारीत केलेले आहेत. त्यानूसार संबंधित विभागप्रमुख यांनी कार्यवाही करावी.

(डॉ.सचिन बांगर)
अतिरिक्त आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति,
1) उपायुक्त (सर्व)
2) खातेप्रमुख / विभाग प्रमुख (सर्व)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत माहितीस्तव :-
मा.आयुक्त,
मिरा भाईंदर महानगरपालिका